दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | सोमवार, 25 मे 2026 | अंक क्र. 23 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''
VEGAN - 100% -
हॉटेल बालाजी
ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.


# देशात कोरोनापेक्षा 20 पट भयंकर परिस्थिती येणार

## इंधन दरवाढीवर मोदी जनतेला 'स्लो पॉईजन' देत असल्याचा विरोधकांचा घणाघात




**मुंबई |** आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे केंद्राने सोमवारी पुन्हा एकदा पेट्रोल व डिझेलच्या किंमतीत अनुक्रमे 2.72 व 2.81 रुपयांची वाढ केली. गत 10 दिवसांतील ही चौथी दरवाढ आहे. त्यामुळे महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या सर्वसामान्यांना जबर झटका बसला आहे. विरोधकांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवत पंतप्रधान नरेंद्र मोदी या दरवाढीच्या माध्यमातून जनतेला स्लो पॉईजन देत असल्याचा आरोप केला आहे.

पेट्रोल आणि डिझेल आजपासून अनुक्रमे प्रति लीटर 2.72 व 2.81 रुपयांनी महाग झाले आहे. नवे दर आज 25 मे पासून तात्काळ लागू झाले आहेत. मागील 10 दिवसांत करण्यात आलेली ही चौथी दरवाढ आहे. त्यामुळे विरोधकांनी सरकारवर चांगलेच तोंडसूख घेतले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी या दरवाढीवरून सरकारवर जोरदार हल्ला चढवला. या प्रकरणी त्यांनी दिवंगत माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी व डॉक्टर मनमोहन सिंग यांची आठवण काढली.

### ■ कोरोनापेक्षा 20 पट भयंकर परिस्थिती उद्भवणार

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही मोदींच्या धोरणामुळे देशात कोरोना काळापेक्षा 20 पट वाईट परिस्थिती निर्माण होणार असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, सध्याची इंधन टंचाई कृत्रिम नाही. काल अमेरिकेने भारतावर आणखी एक निर्णय लादला. भारताने इराण व रशियाकडून तेल खरेदी करू नये. अमेरिकेचे तेल कितीही महाग असले तरी ते तेल भारताने खरेदी केले पाहिजे, असा फतवा अमेरिकेने काढला आहे. त्यामुळे ही टंचाई कृत्रिम नाही. ही टंचाई निर्माण होण्यास सरकार जबाबदार आहे. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे पेट्रोल - डिझेल मिळत नाही. उद्या पेट्रोल 150 रुपयांवर जाईल आणि डिझेलही 140 रुपयांवर जाईल. पुढच्या महिन्याभरात ही परिस्थिती उद्भवेल.

फक्त एवढेच आहे की, एकाचवेळी वाढवायचे नाही, म्हणून एक-दोन रुपयांनी वाढ करणे सुरू आहे. भविष्यात 8 दिवसांनी दरात प्रत्येकी 5 रुपयांनी वाढ होताना दिसेल. हे लपून राहणार नाही. महाराष्ट्रातील शेतकरी उद्ध्वस्त होईल. कोरोनामध्ये जी परिस्थिती होती, त्याच्या 20 पट परिस्थिती वाईट होईल. पूर्ण देश उद्ध्वस्त होईल. त्याचे कारण असे आहे की, एपस्टीन फाईल व अदानींचे प्रकरण यामुळे देश अमेरिकेच्या दावणीला बांधण्यात आला आहे.

ट्रम्प म्हणतात की, मोदींना फोन कुठे व करावा केव्हा करावा हे ठावूक आहे. ते योग्यवेळी मला फोन करतात. याचा अर्थ असा आहे की, भारताच्या पंतप्रधानांचा हात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी दगडाखाली ठेवला आहे. तो काढता येत नाही. त्यामुळे ही परिस्थिती ओढावली आहे. परिस्थिती उद्या भयावह होणार आहे, असे वडेट्टीवार आज सकाळी पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

### ■ कच्चे तेल स्वस्त तरीही दरवाढ का?

विजय वडेट्टीवार आपल्या अन्य एका ट्विटद्वारे म्हणाले, ब्रेंट क्रूड आंतरराष्ट्रीय बाजारात $100 च्या खाली घसरलंय, कच्चं तेल स्वस्त झालंय. पण भारतात मात्र पेट्रोल-डिझेलचे दर गगनाला भिडत आहेत! गेल्या 10 दिवसांत इंधन दरवाढ तब्बल 7 रुपयाने झालीये. हा थेट सामान्य माणसाच्या खिशावर टाकलेला दरोडा नाही तर काय?

क्रोनोलॉजी समजून घ्या. जागतिक बाजारात क्रूड महागलं की लगेच सरकारला जागतिक संकट आठवतं, अर्थव्यवस्था धोक्यात आल्याचं रडगाणं सुरू होतं. जागतिक बाजारात क्रूड स्वस्त झालं की सरकार एकदम मौनात जातं, दरकपातीचा पत्ताच नसतो. दरवाढ करायची असेल तर ती एका रात्रीत, तात्काळ होते पण आंतरराष्ट्रीय बाजारात दर घसरल्यावर दरकपात मात्र कधीच होत नाही. हा डायनॅमिक प्रायसिंगचा खेळ फक्त जनतेला लुटण्यासाठीच सुरू आहे का?

देशातील जनता मूर्ख नाहीये. निवडणुका आल्या की पेट्रोलचे दर जैसे थे असतात आणि निवडणुका संपल्या की जनतेच्या खिशावर सर्जिकल स्ट्राईक सुरू होतो! म्हणजेच भाजपसाठी जनता ही फक्त मतदान करण्यापुरती आणि नंतर वसुली करण्यासाठी ATM मशीन ठरली आहे. मोदी सरकारने स्पष्ट उत्तर द्यावं. क्रूड स्वस्त झाल्यावरही भारतात पेट्रोल-डिझेल महाग का? जनतेच्या घामाचा पैसा नक्की कुठे जातोय? की काही मोजक्या उद्योगपती मित्रांच्या तिजोऱ्या भरण्यासाठी हा देश लुटला जातोय? असे ते म्हणालेत.

### ■ सरकार मेलोडी चॉकलेट खाऊन गप्प

रोहित पवार म्हणाले, आज पंडीत नेहरु किंवा स्व. इंदिरा गांधी किंवा अटलबिहारी वाजपेयी किंवा डॉ. मनमोहनसिंग यांच्यासारखं जागतिक प्रश्नात हस्तक्षेप करु शकणारं उत्तुंग नेतृत्त्व नसण्याचा जबर फटका देशाला सहन करावा लागतोय. आज पेट्रोल-डिझेलच्या दरात लिटरमागे अडीच रुपये वाढ झाली असून रोजच होणारी ही दरवाढ म्हणजे सरकारचं अर्थव्यवस्थेवरील नियंत्रण पूर्णपणे सुटल्याचं लक्षण आहे. या दरवाढीमुळं देश ठप्प होत असताना सरकार मात्र मेलोडी चॉकलेट खाऊन गप्प बसलंय. यावर उपाययोजना करण्यास सरकार पूर्णतः असमर्थ ठरत असल्याने हा देश वाचावा यासाठी आपण एकतर केवळ प्रार्थना करु शकतो किंवा व्यवस्थेच्या विरोधात रस्त्यावर उतरुन सरकारला जाब विचारु शकतो. चॉईस जनतेचा आहे.

### ■ गिरीश महाजनांचा घेतला समाचार

रोहित पवार यांनी यावेळी 'रांगेत उभे राहणारे काळा बाजार करणारे' असल्याचा दावा करणाऱ्या मंत्री गिरीश महाजन यांच्याही विधानाचा समाचार घेतला. ते म्हणाले, ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर डिझेल नसल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला असताना 'रांगेत उभे राहणारे काळा बाजार करणारे आहेत,' हे मंत्री गिरीश महाजन यांचं वक्तव्य अत्यंत संतापजनक आणि असंवेदनशील आहे. रांगेत उभे राहणारे गोरगरीब शेतकरी आहेत, काळाबाजार करायला ते काही सत्तेतील मंत्री नाहीत. महाकुंभमेळ्याच्या कामात निविदा वाढवून रिंग करून किती काळाबाजार केला हे जगजाहीर आहे. कुंभमेळ्याच्या कामांमध्ये केलेल्या काळ्या बाजाराबाबत लवकरच पुराव्यासकट बोलणार आहे..!

### ■ मोदीजी देशवासीयांना 'स्लो पॉईजन' देत आहेत

शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी एकनाथ खडसे यांनीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला. झोपलेले असाल तर जागे व्हा ! तुम्हाला आणखी एक झटका बसलाय. आज पेट्रोल डिझेलचे दर पुन्हा वाढले आहेत. पेट्रोल 2 रुपये 61 पैशांनी तर डिझेल 2 रुपये 71 पैशांनी. मागील 10 दिवसांत ही चौथी वाढ आहे. आम्ही आधीच सांगितले होते की निवडणुकीचा संपूर्ण खर्च भाजप सरकार हळूहळू वसूल करणार आहे. हा चौथा हफ्ता असून मोदीजी देशवासीयांना 'स्लो पॉईजन' देत आहेत, असे त्या म्हणाल्या.

### ■ दरवाढ शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक आघात करणारी

आमदार रोहित पाटील यांनीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, दोन आठवड्यांत चौथ्यांदा इंधन दरवाढ झाली आहे. शेतीच्या मशागतीचा हंगाम सुरू असताना डिझेल-पेट्रोलचे वाढते दर शेतकऱ्यांसाठी मोठा आर्थिक आघात ठरत आहेत. इंधन दरवाढीमुळे महागाई आणखी वाढण्याची शक्यता आहे. भाजीपाला, धान्य, दूध, वाहतूक आणि जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढण्याचा फटका सामान्य कुटुंबांना बसणार आहे. अशा संवेदनशील काळात सरकारने जनतेला दिलासा देण्याऐवजी वारंवार दरवाढ करून आर्थिक संकट अधिक गंभीर होत आहे.

# पी.एस.आय लक्ष्मण उंबरे यांची ए.पी.आय पदावर पदोन्नती



**परळी | प्रतिनिधी :**

कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि जबाबदारीने सेवा बजावणारे पी.एस.आय लक्ष्मण उंबरे यांची नुकतीच ए.पी.आय (असिस्टंट पोलिस इन्स्पेक्टर) पदावर पदोन्नती झाल्याबद्दल रविवार दिनांक २४ मे रोजी परळी येथील चेमरी रेस्ट हाऊस येथे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी उंबरे यांच्या कार्याचा गौरव करत पुढील सेवाकार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी फुले-आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे, लक्ष्मण वैराळ, विनोद उंबरे, हेड कॉन्स्टेबल कोरडे, मेजर, पोलिस नाईक गवते, पोलीस कॉन्स्टेबल भोसले, पो. कॉ. भोसले, पो. कॉ. कोकाटे, पो. कॉ. गमे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन तसेच शाल-श्रीफळ प्रदान करून त्यांचा सत्कार केला.

लक्ष्मण उंबरे हे सध्या राज्याचे माजी मंत्री मा. धनंजय मुंडे यांच्या व्ही. आय.पी. सुरक्षा पथकात पी.एस.आय म्हणून कार्यरत असून त्यांनी आपल्या कर्तव्यदक्ष आणि तत्पर सेवेमुळे विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या पदोन्नतीमुळे सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी त्यांच्या सुरक्षा पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी उंबरे यांच्या पुढील प्रशासकीय आणि सेवाभिमुख वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

# बीड सायबर पोलिसांची मोठी कामगिरी

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) घोटाळ्याचा पर्दाफाश

## आरोपींना अटक, ८१.७८ लाख रुपये हस्तगत

**बीड | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) योजनेअंतर्गत कर्जावरील अनुदानाच्या (सबसिडी) रक्कमेचा अपहार करणाऱ्या टोळीचा बीड सायबर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे पर्दाफाश केला आहे. या अत्यंत क्लिष्ट गुन्ह्याचा छडा लावत पोलिसांनी मुख्य आरोपींना अटक केली असून, अपहार केलेल्या रक्कमेपैकी तब्बल ८१,७८,२८९/- रुपये (एक्क्याऐंशी लाख अठ्ठ्याहत्तर हजार दोनशे नवऱ्याण्णव रु.) ची रक्कम गोठवून (फ्रीज करून) ती परत मिळवण्यात मोठे यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी या योजनेचा गैरफायदा घेण्यासाठी कर्जदारांचे खोटे व बनावट दस्तऐवज (कागदपत्रे) तयार केले होते. त्यानंतर बँकेच्या अधिकृत पोर्टल लॉगिनचा गैरवापर करून एकूण २,५१,५१,६९२/- रुपये (दोन कोटी एक्कावन्न लाख एक्कावन्न हजार सहाशे ब्याण्णव रु.) या शासकीय अनुदानाच्या रक्कमेचा अपहार केला होता.

याप्रकरणी फिर्यादी बाळासाहेब त्रिंबक यशवंत (वय ५४ वर्षे, व्यवसाय- शासकीय नोकरी, पद- उद्योग सहसंचालक, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) यांच्या फिर्यादीवरून बीड शहर पोलीस



ठाण्यात गुरनं. १३९/२०२४, कलम- ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०९, ३४ भादंविसह ६६(ड) IT Act अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेता हा गुन्हा बीड शहर पोलिसांकडून सायबर पोलीस ठाण्याकडे तपासासाठी वर्ग करण्यात आला होता. सायबर पोलिसांनी आधुनिक तांत्रिक पद्धतींचा वापर करून अत्यंत गुंतागुंतीच्या या गुन्ह्यातील आरोपींचा माग काढला आणि त्यांना बेड्या ठोकल्या. तसेच, अपहार झालेल्या मोठ्या रकमेपैकी ८१.७८ लाख रुपयांची रक्कम आरोपींकडून वसूल करत ती फ्रीज करण्यात यश मिळवले.

ही कारवाई बीडचे माननीय पोलीस अधीक्षक आणि माननीय अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन बीडच्या टीमने केली आहे.

# कर्मवीर एकनाथराव आवाड स्मृतिदिनानिमित अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहावे : कपिल आवाड

**तेलगाव/प्रतिनिधी**

मानवी हक्क अभियानचे संस्थापक अध्यक्ष कर्मवीर एकनाथराव आवाड साहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त सोमवार दि.25 मे 2026 रोजी सकाळी 11 वाजता मानवी हक्क अभियान कार्यालय तेलगाव ता. धारूर जि. बीड येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . या कार्यक्रमास हजारोच्या संख्येने समाजबांधवानी उपस्थित उपस्थित राहावे , असे आवाहन मा.ह.अभियानचे युवा नेते कपिल आवाड यांनी केले आहे .



जिजांनी आपले संपूर्ण आयुष्य वेठबिगार, ऊसतोड कामगार, वंचितांच्या न्याय हक्कासाठी अपर्ण केले.मराठवाड्यामध्ये आंबेडकर चळवळ रुजवण्यात जिजांचे मोठे योगदान आहे. त्यांनी लढाऊ कार्यकर्तेही घडवले, समाज सुधारण्यासाठी त्यांनी कार्य केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर दलीत समाजासाठी त्यांनी काम केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन गयाबाई एकनाथ आवाड यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी मा.ह.अभियानचे ज्येष्ठ नेते दादासाहेब क्षीरसागर उपस्थित राहणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा.डॉ.मिलिंद नाना आवाड तसेच इतर मान्यवरही उपस्थित राहणार आहेत. तरी मानवी हक्क अभियानचे सर्व कार्यकर्त्यांनी,पदाधिकाऱ्यांनी आणि समाजबांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आले.

# त्या 78 महाविद्यालयांच्या अनुदान संदर्भात मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार : आमदार डॉ. मनीषा कायंदे

राज्यातील कायम धोरणा पूर्वीच्या त्या अष्टयात्तर महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देऊन तुम्हा सर्वांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात मी अर्थमंत्री तथा राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडवणीस यांच्याकडे मी स्वतः पाठपुरावा करून येणाऱ्या अधिवेशनामध्ये या विषयासंदर्भात अनुदान मंजुरीची प्रक्रिया करून घेणार असे आश्वासन विधान परिषदेच्या आमदार , मा . मनिषाताई कायंदे यांनी महाराष्ट्र राज्य कृती समिती (एम)चे पदाधिकारी यांना त्यांच्या निवासस्थानी झालेल्या नियोजित बैठकीमध्ये दिले. शासनाचा एकही रुपया पगार न घेता गेली सव्वीस वर्षांपासून कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध पातळीवरील



त्यांच्या समस्या , दुःख वेदना ऐकून त्या अत्यंत भावुक झाल्या. वर्षानुवर्षे अर्थ खाते सांभाळणाऱ्या व्यक्तींना ही समस्या का सोडवावी वाटली नाही ? याबद्दलही त्यांनी खेद व्यक्त केला.

मुंबई मधील त्यांच्या दादर येथील कार्यालयात दिनांक २० मे २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य (एम ) कृती समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी .डी. मुंडे , उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. रामदास नाईकनवरे आणि सचिव प्राचार्य एम एस मुरुडकर यांनी त्यांच्या निवासस्थानी घेतलेल्या नियोजित भेटीदरम्यान त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, राज्यातील कायम धोरणा पूर्वीच्या या ७८ महाविद्यालयाच्या संदर्भात मला पूर्ण कल्पना आहे. या महाविद्यालयांच्या अनुदानासाठी मी मागील दोन ते तीन वर्षापासून प्रत्येक अधिवेशनात तुमचा प्रश्न सभागृहामध्ये मांडत आहे. मला माहित आहे की, महाराष्ट्र राज्य कृती समिती (एम )च्या वतीने पुणे येथील संचालक कार्यालयासमोर तुम्ही केलेले अमरण उपोषण असो , किंवा मुंबई येथील आझाद मैदानावर जीवाची परवा न करता तुम्ही केलेले सहा महिन्याचे आंदोलन असो , या सर्व आंदोलनामध्ये मी तुमच्या पाठीशी उभा होते. आज तुम्ही विनावेतन सेवा करत सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर येऊन उभे आहात. शासनाच्या एक लोकप्रतिनिधी म्हणून मी लवकरच आपला प्रश्न महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या समोर ठेवून, तुम्हाला योग्य न्याय देण्याचा शंभर टक्के प्रयत्न करेन.

## गोवंश तस्करांचा रक्तरंजीत धुमाकूळ

# बजरंग दल कार्यकर्त्याची दगडांनी ठेचून निर्घृण हत्या

## पाठलाग करणाऱ्या तरुणाच्या हत्येने खळबळ; महागाव बंद, जिल्ह्यात संतापाची लाट

**गोवंश तस्करी करणाऱ्या वाहनाचा पाठलाग करणाऱ्या बजरंग दलाच्या कार्यकर्त्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याने संपूर्ण परिसर हादरला आहे. सुकळी (ता. उमरखेड) येथे शनिवारी मध्यरात्री घडलेल्या या थरारक घटनेने जिल्ह्यात प्रचंड तणाव निर्माण झाला असून हिंदुत्ववादी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. मृत तरुणाचे नाव गजानन मारोती सुरोशे (रा. वडद-मुडाणा) असे असून ते बजरंग दलाचे सक्रीय कार्यकर्ते होते.त्यांच्या अकाली आणि हिंसक मृत्यूमुळे तालुक्यात शोककळा पसरली आहे.**









### ■ टोल नाक्यावरून सुरू झाला पाठलाग

माहितीनुसार, यवतमाळ- महागाव मार्गाने एक बोलेरो पीक-अप वाहनात (क्र. एमएच २९ बीई ८९१५) मोठ्या प्रमाणावर गोवंश भरून कत्तलीसाठी उमरखेडच्या दिशेने नेण्यात येत होते. वाहनात १६ ते १७ गोवंश कोंबून नेण्यात येत असल्याचे कळते. नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील बिजोरा टोल नाक्यावर या वाहनाने संशयास्पदरीत्या वेग वाढवला व हुलकावणी दिली. दरम्यान, टोल नाक्यावर गोवंश तस्करीवर लक्ष ठेवून असलेले बजरंग दलाचे काही कार्यकर्ते सतर्क झाले. त्यांनी तातडीने वाहनाचा पाठलाग सुरू केला. गजानन सुरोशे यांनीही आपल्या एस क्रॉस (क्र. एमएच १२ पीटी ८६३४) कारमधून संशयित बोलेरोचा पाठलाग केला.

### ■ सुकळी गावात सापळा रचून दगड-लाकडांनी अमानुष मारहाण

पाठलाग सुरू असताना बोलेरो चालकाने वाहन सुकळी गावाच्या दिशेने वळवले. सुरोशे यांचे वाहनही मागोमाग गावात शिरले. याच वेळी बोलेरोतील संशयित तस्कर अचानक बाहेर आले आणि त्यांनी गजानन सुरोशे यांच्या वाहनावर मोठमोठे दगड आणि लाकडांनी हल्ला चढवला.

अचानक झालेल्या या भीषण हल्ल्यात कारची मोठ्या प्रमाणात तोडफोड झाली. या संपूर्ण घटनाक्रमाचे सीसीटीव्ही फुटेज हाती आले असून एकुणच घटनाक्रम काळजाचा ठोका चुकविणारा आहे. भीषण दगडफेकीत गजानन सुरोशे गंभीर जखमी झाले. स्थानिक गावकऱ्यांनी त्यांना तातडीने उमरखेड येथील रुग्णालयात हलवण्याचा प्रयत्न केला, मात्र उपचारासाठी नेत असतानाच वाटेत त्यांचा मृत्यू झाला.

### ■ परिसरात तणाव; महागाव बंदची हाक

या घटनेनंतर उमरखेड, महागावसह संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. बजरंग दलाने या हत्येचा तीव्र निषेध करत महागाव बंदची हाक दिली. रविवारी सकाळपासून कार्यकर्त्यांनी बाजारपेठेत फिरून व्यापाऱ्यांना दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. व्यापाऱ्यांनीही या आवाहनाला प्रतिसाद देत बहुतांश व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवली. परिस्थिती चिघळू नये यासाठी पोलिस प्रशासन सतर्क झाले असून संवेदनशील भागात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरमन्यात पोलीस अधिक्षक कुमार चिंता आणि उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली व तपासाला गती दिली.

### ■ आरोपींचा शोध सुरू

या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. गोवंश तस्करीच्या संशयातून घडलेल्या या खुनामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, गजानन सुरोशे यांच्या हत्येचा निषेध करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी विविध हिंदुत्ववादी संघटनांकडून करण्यात येत आहे. बोलेरो पीक अप वाहन सुकळी येथीलच असल्याची चर्चा आहे.

---

# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. या वाढत्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन' साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे प्लास्टिकचा वाढता वापर कमी करणे, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आणि पृथ्वीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे.

आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. परंतु याच टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे.

प्लास्टिकचा इतिहास पाहिला तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कृत्रिम पदार्थांच्या शोधातून त्याची निर्मिती झाली. सुरुवातीला त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर सुरू झाला. स्वस्त आणि टिकाऊ असल्यामुळे प्लास्टिकने जगभरातील बाजारपेठ व्यापली. आज जगात दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिकची निर्मिती केली जाते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक निर्माण होते आणि त्यातील मोठा भाग एकदाच वापरून फेकून दिला जातो. हे प्लास्टिक नद्यांमधून समुद्रात जाते आणि समुद्री जीवांसाठी घातक ठरते.

एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायामुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.

प्लास्टिकमुळे निर्माण होणारे सर्वात मोठे संकट म्हणजे प्रदूषण. प्लास्टिक सहज कुजत नाही. जमिनीत टाकलेले प्लास्टिक अनेक वर्षे तसेच राहते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. शेतीमधील पाण्याचा निचरा अडतो. जनावरे प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा कचऱ्यातील प्लास्टिक जाळले जाते. त्यातून विषारी वायू बाहेर पडतात. हे वायू मानवाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात. प्लास्टिक जाळल्यामुळे डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे विषारी घटक वातावरणात मिसळतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, कर्करोग आणि त्वचारोग यांसारख्या समस्या वाढतात.

समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आजची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या मानली जाते. दरवर्षी लाखो टन प्लास्टिक समुद्रात मिसळते. समुद्री पक्षी, कासव, मासे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकचे तुकडे अन्न समजून खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टिक साचते आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या जाळ्यांमध्ये समुद्री जीव अडकतात. समुद्रातील सूक्ष्म प्लास्टिकचे कण अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. मासे आणि इतर समुद्री अन्नाद्वारे हे सूक्ष्म कण पुन्हा मानवाच्या शरीरात पोहोचतात. संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की सूक्ष्म प्लास्टिक मानवी रक्त, फुफ्फुसे आणि अगदी गर्भाशयातही आढळू लागले आहे.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ पर्यावरणीय नाही तर सामाजिक आणि आर्थिक समस्याही आहे. शहरांमध्ये वाढणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामुळे गटारे तुंबतात आणि पूरस्थिती निर्माण होते. पावसाळ्यात नाले तुंबल्यामुळे शहरे जलमय होतात. यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते. नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना कचरा व्यवस्थापनासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागतात. प्लास्टिक कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे ही मोठी समस्या बनली आहे.

ग्रामीण भागातही प्लास्टिकचे संकट वाढत आहे. शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, रासायनिक खतांच्या पॅकेजिंग, कीटकनाशकांच्या बाटल्या आणि विविध कृषी साहित्यामुळे शेतजमिनी प्रदूषित होत आहेत. गावांमध्ये योग्य कचरा व्यवस्थापन नसल्यामुळे प्लास्टिक उघड्यावर फेकले जाते किंवा जाळले जाते. याचा परिणाम पशुधन, माती आणि पाण्यावर होत आहे. अनेक वेळा गायी आणि इतर जनावरे कचऱ्यातील प्लास्टिक खातात. त्यांच्या पोटात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक साचल्यामुळे त्यांचा मृत्यू होतो.

मानवी आरोग्यावर प्लास्टिकचे होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. प्लास्टिकमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक रसायनांचा मानवी शरीरावर घातक परिणाम होतो. बिस्फेनॉल-ए, फ्थॅलेट्स यांसारखी रसायने हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी किंवा गरम पदार्थांमुळे या रसायनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे मधुमेह, हृदयविकार, प्रजनन समस्या आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुलांमध्ये प्लास्टिकच्या खेळण्यांमधूनही विषारी रसायने शरीरात जाण्याचा धोका असतो.

प्लास्टिकचा संबंध हवामान बदलाशीही जोडला जातो. प्लास्टिकची निर्मिती ही प्रामुख्याने पेट्रोलियम पदार्थांपासून केली जाते. त्यामुळे प्लास्टिक उद्योगातून मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू उत्सर्जित होतात. प्लास्टिक उत्पादन, वाहतूक आणि जाळण्याच्या प्रक्रियेमुळे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या समस्येत भर पडते. भविष्यात प्लास्टिक उत्पादन असेच वाढत राहिले तर पर्यावरणीय संकट आणखी तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा केवळ औपचारिक दिन नसून पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ आहे. या निमित्ताने जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी विभागांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. प्लास्टिक वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कापडी पिशव्यांचा प्रचार, प्लास्टिक संकलन मोहीम आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबवले जातात.

भारतानेही प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने एकदाच वापरल्या जाणाऱ्या काही प्लास्टिक वस्तूंवर बंदी घातली आहे. अनेक राज्यांनी प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणले आहेत. महाराष्ट्राने प्लास्टिक बंदीबाबत कठोर निर्णय घेतला होता. प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल साहित्य आणि एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर बंदी घालून पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न करण्यात आला. सुरुवातीला या निर्णयाला विरोध झाला, परंतु हळूहळू नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यास सुरुवात केली.

प्लास्टिक बंदी यशस्वी होण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नाहीत. नागरिकांचा सक्रिय सहभागही अत्यंत आवश्यक आहे. आपण स्वतःपासून बदल सुरू केला पाहिजे. बाजारात जाताना कापडी पिशवी वापरणे, प्लास्टिक बाटल्यांऐवजी स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, प्लास्टिक स्ट्रॉ आणि चमच्यांना नकार देणे, प्लास्टिकच्या सजावटीऐवजी नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे अशा छोट्या सवयी मोठा बदल घडवू शकतात.

शिक्षण संस्थांची भूमिका प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यात अत्यंत महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षणावर भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली तर भविष्यात जबाबदार नागरिक घडतील. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी मोहिमा राबवाव्यात. शाळांमध्ये प्लास्टिकऐवजी पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला पाहिजे. विविध स्पर्धा, रॅली, प्रबोधन कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होऊ शकते.

महिलांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त समाज उभारण्यात महत्त्वाची आहे. घरातील खरेदी, स्वयंपाकघरातील साहित्य आणि दैनंदिन वापरातील वस्तूंमध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. त्यांनी प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारले तर संपूर्ण कुटुंबात चांगली सवय निर्माण होऊ शकते. अनेक स्वयंसेवी संस्था महिलांना कापडी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण देत आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळत आहे.

आज अनेक उद्योग आणि कंपन्याही प्लास्टिक कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. काही कंपन्या पुनर्वापर करता येणारे पॅकेजिंग वापरत आहेत. जैवविघटनशील प्लास्टिक, कागदी पॅकेजिंग आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर वाढवला जात आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

पर्यावरणपूरक उत्पादनांना ग्राहकांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्यामुळे उद्योगक्षेत्रातही सकारात्मक बदल होत आहेत. तथापि, अजूनही मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पॅकेजिंगचा वापर होत असल्यामुळे अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे.

पुनर्वापर आणि पुनर्चक्रण ही प्लास्टिक समस्येवर मात करण्याची महत्त्वाची साधने आहेत. सर्व प्लास्टिक टाळणे तात्काळ शक्य नसले तरी त्याचा योग्य वापर आणि पुनर्चक्रण आवश्यक आहे. घरातील कचरा ओला आणि सुका असा वेगळा केला पाहिजे. प्लास्टिक कचरा पुनर्चक्रणासाठी वेगळा जमा करणे गरजेचे आहे. अनेक शहरांमध्ये पुनर्चक्रण प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. तथापि, सर्व प्रकारचे प्लास्टिक पुनर्चक्रित होत नाही. त्यामुळे वापर कमी करणे हा सर्वात प्रभावी उपाय मानला जातो.

ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्लास्टिकमुक्त मोहिमा प्रभावीपणे राबवल्या पाहिजेत. गावपातळीवर ग्रामसभा घेऊन जनजागृती करणे, बाजारपेठांमध्ये प्लास्टिक वापरावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध करून देणे आणि नियमांचे कठोर पालन करणे आवश्यक आहे. शहरांमध्ये कचरा व्यवस्थापन सुधारले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली पाहिजे.

प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारण्यासाठी काही साध्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरू शकतात. उदाहरणार्थ, पाण्यासाठी स्वतःची बाटली वापरणे, चहा किंवा कॉफीसाठी स्टील किंवा मातीचे कप वापरणे, वाढदिवस आणि कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक सजावट टाळणे, ऑनलाईन खरेदीमध्ये अनावश्यक पॅकेजिंगला नकार देणे आणि शक्य तितक्या नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे. या छोट्या कृतींमधून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.

भारतीय संस्कृतीत निसर्गाला देवत्व मानले गेले आहे. झाडे, नद्या, पर्वत आणि पृथ्वी यांचे पूजन करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत आहे. पूर्वीच्या काळात जीवनशैली अधिक पर्यावरणपूरक होती. पत्रावळी, मातीची भांडी, बांबूच्या वस्तू आणि कापडी पिशव्या वापरल्या जात होत्या. आधुनिकतेच्या अतिरेकात आपण या परंपरा विसरलो. आता पुन्हा एकदा पारंपरिक आणि शाश्वत जीवनशैलीकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे.

आज जगभरात 'झिरो वेस्ट' आणि 'सस्टेनेबल लिव्हिंग' या संकल्पना लोकप्रिय होत आहेत. कमीत कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे यावर भर दिला जात आहे. अनेक देशांनी प्लास्टिक कमी करण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. काही देशांमध्ये प्लास्टिक पिशव्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्यामुळे लोक पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रवृत्त होतात.

समाजमाध्यमांची भूमिका देखील प्लास्टिकमुक्त मोहिमेत महत्त्वाची ठरत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचत आहेत. तरुण पिढी विविध अभियानांमध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. समुद्रकिनारे, नद्या आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी स्वयंसेवी गट काम करत आहेत. प्लास्टिक कचऱ्यापासून कलात्मक वस्तू तयार करून जनजागृती करण्याचे उपक्रमही राबवले जात आहेत.

प्लास्टिकचा प्रश्न हा केवळ सरकार किंवा पर्यावरणप्रेमी लोकांचा नाही तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आपण वापरत असलेली प्रत्येक प्लास्टिक वस्तू भविष्यात पर्यावरणासाठी समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे 'वापरा आणि फेका' ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. गरजेपुरतेच खरेदी करणे, टिकाऊ वस्तू वापरणे आणि कचरा कमी करणे या सवयी लावल्या पाहिजेत.

प्लास्टिकमुक्त भारत घडविण्यासाठी युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तरुण पिढी नवीन विचार स्वीकारण्यास अधिक तत्पर असते. महाविद्यालयीन विद्यार्थी पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होत आहेत. अनेक युवकांनी प्लास्टिकमुक्त कार्यक्रम आयोजित करणे, कापडी पिशव्यांचे वितरण करणे आणि स्वच्छता अभियान राबवणे यांसारखे उपक्रम हाती घेतले आहेत. भविष्यातील भारत पर्यावरणपूरक बनविण्यासाठी युवकांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# बीड जिल्ह्यात अवकाळीचा शेतकऱ्यांना फटका ; तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्या

## खा .बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रशासनाला पत्र

बीड | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात १५ मे २०२६ पासून झालेल्या मुसळधार अवकाळी पाऊस आणि जोरदार चक्रीवादळाने संपूर्ण जिल्ह्याला झोडपून काढले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्ह्यातील शेती पिके, फळबागा, कृषी संरचना आणि मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकरी व ग्रामीण जनता मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहे. या पार्श्वभूमीवर बीड लोकसभेचे खा. बजरंग सोनवणे यांनी संवेदनशील भूमिका घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्राताई पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना पत्र दिले आहे.

पत्रात म्हटले आहे, नुकसानग्रस्त भागाचे संयुक्त पथकांमार्फत युद्धपातळीवर पंचनामे करून त्वरित आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. १५ मे पासून सुरू असलेल्या या अस्मानी संकटामुळे जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हाताशी आलेली उभी पिके, फळबागा पूर्णपणे उदध्वस्त झाल्या आहेत. याशिवाय, चक्रीवादळाच्या तीव्रतेमुळे शेतातील ठिबक सिंचन संच, पाइपलाइन, महागडे शेडनेट, मोटार पंप, विद्युत जोडण्या आणि इतर कृषी उपकरणांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे आधीच संकटात असलेला बीडचा बळीराजा संपूर्णपणे आर्थिक कोंडीत सापडला आहे.

### विद्युत पुरवठा खंडित; जनजीवन पूर्णपणे विस्कळीत

**वादळी वाऱ्यामुळे जिल्ह्यातील अनेक भागांत विद्युत खांब आणि वीज तारा उन्मळून पडल्या आहेत. परिणामी, शेकडो गावांतील वीज पुरवठा गेल्या काही दिवसांपासून पूर्णपणे खंडित झाला आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि दैनंदिन कामे ठप्प झाल्याने ग्रामीण भागातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे व चिंतेचे वातावरण आहे.**

### घरे, गोठे जमीनदोस्त; दुर्दैवी घटनांमध्ये जनावरे दगावली

**केवळ शेतीच नव्हे, तर ग्रामीण भागातील जनजीवनालाही या वादळाचा मोठा फटका बसला आहे. अनेक गावांमध्ये नागरिकांची घरे, गुरांचे गोठे आणि निवारे कोसळले आहेत. अनेक भागांत झाडे आणि भिंती अंगावर पडल्याने मुख्य पाळीव जनावरे दगावल्याच्या अत्यंत दुर्दैवी घटना घडल्या आहेत. यामुळे ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांचे उदरनिर्वाहाचे साधन हिरावले गेले आहे.**



### संयुक्त पथकांमार्फत तात्काळ पंचनाम्यांचे आदेश द्यावेत!

**खा.सोनवणे यांनी मुख्यमंत्री, पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, या नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्ह्यातील शेतकरी आणि ग्रामीण नागरिक अत्यंत अडचणीत आहेत. त्यांना शासनाच्या तातडीच्या मदतीची नितांत गरज आहे. यासाठी महसूल विभाग, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि महावितरण यांच्या संयुक्त पथकांमार्फत तात्काळ सर्व नुकसानग्रस्त भागाचे संयुक्त सर्वेक्षण (Joint Survey) करून अचूक पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला द्यावेत. तसेच, पीडित शेतकरी व नागरिकांना शासनाच्या नियमानुसार त्वरित आर्थिक मदत मंजूर करून आवश्यक ते प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करावेत, अशी आग्रही मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे.**

# रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या कार्याचे प्रांतपाल यांचेकडून कौतुक

## सामाजिक बांधिलकी जोपासत पुरस्कार वितरण

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईच्या पदाधिकारी व सदस्य यांची रोटरी प्रांतपाल रो.सुधीर लातुरे (डिस्ट्रिक्ट ३१३२) यांनी भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला, दांपत्य आणि युवती यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जोपासत आपले योगदान दिले असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे यांनी दिली आहे.






शहरातील टि.बी.गिरवलकर अभियांत्रिकी महाविद्यालय येथे गुरूवार, दि. २१ मे २०२६ रोजी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईस रोटरी प्रांतपाल यांची अधिकृत भेट व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून रो.सुधीर लातुरे (प्रांतपाल ३१३२), फर्स्ट लेडी रो.सौ.संगीता लातुरे, रो.डॉ.गिरीश कुलकर्णी (उपप्रांतपाल), डॉ.तापडिया, रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे व सचिव रो.सुनील व्यवहारे आणि मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण व प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यासाठी सौ.आरती शिंदे व माजी नगरसेवक सौ.संगीता व्यवहारे यांची ही प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाचे हे पहिले वर्ष होते. प्रारंभी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई कडून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक करताना रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे अध्यक्ष रो.भिमाशंकर न.शिंदे यांनी सांगितले की, रोटरीच्या माध्यमातून अंबाजोगाई पंचक्रोशीत वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य केले जाईल. समाजाच्या उपयोगी पडेल असे कार्य रोटरीच्या माध्यमातून आम्ही करीत राहू. जिथे कमी तिथे आम्ही ही भावना जोपासून आम्ही कार्य करू व अंबाजोगाईचा सामाजिक वसा व वारसा आम्ही समर्थपणे पुढे घेऊन जाऊत असा विश्वास या कार्यक्रमाच्या माध्यमातून मी सर्वांना देतो. यावर्षी दिलेले पुरस्कार हे फक्त या वर्षापुरतेच मर्यादित न ठेवता प्रांतपाल रो.सुधीर लातुरे यांची आठवण म्हणून दरवर्षी एक दिव्यांग क्षेत्रात तर एक उद्योग क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना देण्यात येईल असे रो.शिंदे यांनी सांगितले. तर यावेळी बोलताना रो.डॉ.गिरीश कुलकर्णी (उपप्रांतपाल) म्हणाले की, भीमाशंकर शिंदे यांना सामाजिक कार्याची आवड आहे. या नव्या क्लबच्या माध्यमातून रोटरीची नवीन लीडरशिप व आयडिया निर्माण होणार असा विश्वास व्यक्त करून नव्या क्लबच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व भीमाशंकर शिंदे आणि त्यांचे सर्व सहकारी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई या नव्या क्लबचे कामही अतिशय उत्तम रितीने करतील असा विश्वास डॉ.कुलकर्णी यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप करताना रो.सुधीर लातुरे (प्रांतपाल ३१३२) यांनी सांगितले की, रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई ही संघटना अवघ्या ८ महिन्यांची असूनही ती अंबाजोगाई शहरातील गरज असलेल्या ठिकाणी पोहचली आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. समाजातील योग्य व्यक्तींपर्यंत पोहचणारी संघटना म्हणून ही नवीन रोटरी नांवारूपाला येत आहे. अवघ्या ८ महिन्यांच्या कालावधी मध्ये रोटरी डिस्ट्रिक्ट मधून आलेल्या सूचनांचे पालन करून त्या पूर्ण करणे ही बाब खरच क्लबच्या भविष्याच्या दृष्टीने एक चांगले पाऊल या क्लबने टाकले आहे. हा क्लब येणाऱ्या काळात डिस्ट्रिक्ट मध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण करेल हा विश्वास मला आहे. माझ्या शुभेच्छा व माझे सर्वोतोपरी सहकार्य या क्लबला राहील असे रो.लातुरे म्हणाले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते रोटरी पुरस्कार ईशा जोशी यांना रोटरी आत्मनिर्भर पुरस्कार, दिपाली जाधव व रमेश सोमवंशी या दांपत्याला रोटरी सक्षम पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुरस्कारांचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, फेटा, पुष्पगुच्छ असे होते. तर कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी रोटरी मित्र स्वर्गवासी संजय गिरी यांच्या पत्नी श्रीमती अर्चना यांना त्यांचा उदरनिर्वाहासाठी पिको फॉल मशीन देऊन रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई त्यांना पुढील अडीअडचणींत पण क्लब आपल्या सोबत राहील असा विश्वास देवून सामाजिक बांधिलकी जोपासली. प्रारंभी रोटरीचे संस्थापक रो.पॉल हॅरीस यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्ज्वलाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश तौर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सचिव रो.सुनील व्यवहारे यांनी मानले. यावेळी कार्यक्रमाला सर्व रोटरीयन श्री.आनंद कर्नावट, पुरूषोत्तम रांदड, जगदीश जाजू, ऍड.प्रवीण बजाज, वाजेद भाई, कृष्णा चव्हाण, विश्वनाथ लहाने, ऍड.कल्याण लोमटे, अविनाश मुके, कलीम शेख, श्रीनिवास पवार, वि.वा.गंगणे, भागवत कांबळे, सोनाली कर्नावट, मनोरमा सिरसाट आदींसह अंबाजोगाई शहरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, विधी, वैद्यकीय, पत्रकारिता, संगीत, सहकार, व्यापार आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई यांचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# वनविभागाचे दुर्लक्ष आणि जंगल तोडीचे वाढते प्रमाण;यामुळेच हिंसक पशुंकडून मानवीय हाणी होत आहे

राज्यासह देशात वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण,सीमेंट रोड,अनिर्बंध बांधकाम व काही ठिकाणी धार्मिकतेच्या नावावर मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे आणि ही बाब सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे तरीही काणावर हात आणि तोंडावर बोट ठेवून बघ्यांच्या भुमिकेत असतांना दिसते.याचाच परिणाम आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल,) यांची मानवावर व पाळीव प्राण्यांनवर आक्रमकता वाढल्याचे दिसून येते.सरकार दरवर्षी सांगत असते की, हजारो कोटींच्या झाडांचे वृक्षलागवड केली.परंतू प्रत्यक्षात वृक्षलागवड झालीच नसते फक्त ती कागदावरच झाल्याचे दिसून येते.आज सरकारने जंगल कटाई करून औद्योगिकरण, शहरीकरण व सिमेंट रोडचे मोठ्या प्रमाणात जाळे विणले व याचा दुष्परिणाम हळूहळू सर्वत्र जाणवत आहे.अशा परिस्थितीत सरकार झाडांची लागवड कुठे करीत आहे ही बाब समजण्यापलीकडची असल्याचे मला वाटते.सरकारकडून होणारी वृक्षलागवड १०० टक्या पैकी ८० टक्के लागवड फक्त कागदावरच असल्याचे वरील घटनांवरून दिसून येते.आज जंगल तोडीच्या कारणांमुळेच चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात वाघाच्या हल्यात चार महिलांचा बळी गेल्याचे दिसून येते.सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गुंजेवाहीच्या जंगलात दिनांक २२ मे २०२६ ला सकाळी तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या महिलांवर वाघाने हल्ला करून चौघींना जागीच ठार केले. अशीच घटना मागील वर्षी मे महिन्यातच तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या तीन महिलांना वाघाने हल्ला करून ठार मारले होते.अशा भयानक घटना सरकारच्या डोळ्यासमोर असुन सुद्धा जंगलतोड थांबलेली नाही व तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांना सरकारने कोणतेही संरक्षण दिलेले नाही हा अत्यंत चिंतेचा विषय आहे.आज जगातील सर्वात जास्त उष्ण शहरांच्या बाबतीत विचार केला तर भारतातील ५० शहरांमध्ये सुर्य आग ओकत आहे ही देशासाठी मोठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल.कारण दिवसेंदिवस देशातील तापमान मोठ्या प्रमाणात वाढतच आहे.दिल्ली,यूपी, मध्यप्रदेश, महाराष्ट्रात पुढील ७ दिवस तापमानात वाढ होणार असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे या राज्यातील अनेक शहरे "रेड अलर्ट" वर आहेत.आज महाराष्ट्रासह देशातील अनेक शहरांचे तापमानाने आपली संपूर्ण सिमा रेषा ओलांडली असून बहुतांश भागात ४५ अंश सेल्सिअस पार झाल्याचे दिसून येते.आज उष्णतेने संपूर्ण विदर्भ होरपळत आहे वर्धा-४७.१, ब्रम्हपुरी -४७.२, नागपूर -४६.६, अमरावती -४६.४, चंद्रपूर -४६.२ आणि इतर शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पार केल्याचे दिसून येते.यामुळेच हिंसक पशुंना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागत.कारण जंगलातील पाणथड्या सुध्दा आटल्या आहेत. बदलत्या हवामानामुळे, वाढत्या तापमानामुळे आणि जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांसाठी असणारा पाणीसाठा संपुष्टात आल्याने वाघ-बिबट्या सारखे हिंसक पशुं गावाकडे किंवा गावांच्या आसपासच्या परिसरात किंवा शहराकडे धाव घेतांना दिसतात. त्यामुळे आज चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात चार महिलांचा वाघाच्या हल्यात बळी गेल्याचे दिसून येते. मागील पाच वर्षांत चंद्रपूर जिल्ह्यात २०२१-२५ दरम्यान २०० जणांचा वन्यजीव हल्यात मृत्यू झाला आणि चालू वर्षातील पाच महिन्यांतील आकडा १९ वर येवून पोहोचला आहे.अशा प्रकारे आतापर्यंत २१९ जणांचा बळी गेला. परंतु सरकारने यावर ठोस उपाययोजना अजुन पर्यंत केलेली ही शोकांतिका म्हणावी लागेल.अशा गंभीर घटनांवर सरकारने कायमस्वरूपी उपाय योजना अमलात आणावी लागेल तेव्हाच हिंसक पशुंवर नियंत्रण ठेवता येईल.कारण वनविभाग आणि शासनाकडून प्रत्यक्ष उपाययोजनांचा अभाव असल्याने मोठ्या जीवीत हाणी होत आहे याचे जिवंत उदाहरण चंद्रपूरमध्ये दिसून आले हा अत्यंत चिंतेचा व गंभीर विषय आहे.आज जंगल तोडीमुळे हिंसक पशुं मानव व पाळीव प्राण्यांनवर हल्ले करीतच आहेत सोबतच जंगल तोडीचा परिणाम पाण्याची समस्या,अकाल इत्यादी अनेक गोष्टींशी निगडीत असल्याने पुढे चालून याचे गंभीर परिणाम पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागतील.कारण वाढत्या तापमान व ढासळती वनसंपदा यामुळेच हिंसक पशुंनी मानवावर आक्रमणाचा पवित्रा घेतल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या अनेक वर्षांपासून चंद्रपूर जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलन सुरू आहे.या संकलनातून दरवर्षी ३५ हजार कुटुंबांना रोजगार मिळतो. उन्हाळ्यात शेतीची कामे नसल्याने अनेक कुटुंबे जंगलात जाऊन तेंदूपत्ता संकलन करतात व आपला उदरनिर्वाह करतात.ही बाब वनविभाग व सरकारला चांगल्याप्रकारे ग्यात असतांना सुध्दा मजुरांना हिंसक पशुंपासुन सरकार संरक्षण करू शकत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. महाराष्ट्रात वन्यजीव प्राण्यांच्या हल्याने वाढती जीवीत हाणी अत्यंत चिंताजनक आहे यामध्ये २०२० मध्ये ९३ लोकांचा बळी गेला,२०२१ मध्ये ११८, २०२२ मध्ये १३४,२०२३ मध्ये-१४७,२०२४मध्ये-१६७ आणि २०२५ मे पर्यंत ७२ जणांचा मृत्यू हिंसक पशुमुळे झाला आहे.ही संपूर्ण मानवीय हाणी जंगल कटाईमुळे निर्माण झालेली मोठी समस्या आहे यावर सरकारने ताबडतोब उपाययोजना करणे गरजेचे आहे.वन्य प्राण्यांना (विशेषतः बिबट्यां,वाघ) वन्यप्राण्यांपासुन मानवी हाणी रोखण्यासाठी महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी जंगलात शेळ्या सोडण्याचे म्हटले होते.तरीही वन्यप्राण्यांकडून मोठ्या प्रमाणात मानवी हाणी होतांना आपण पहातो ही अत्यंत गंभीर बाब आहे. हिंसक प्राण्यांपासून होणारी मानवीय हाणी याचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने यावर तातडीने उपाययोजना करावीत.जय हिंद.




रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )


दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
● बीड, सोमवार, 25 मे 2026

# महेबुबिया सोसायटीच्या नवीन कार्यकारी मंडळाची निवड

## शेख खाजा पुन्हा अध्यक्ष तर बहादुर भाई यांची सचिवपदी निवड









**परळी | प्रतिनिधी**

परळी येथील नामवंत अल्पसंख्याक शिक्षण संस्था असलेल्या महेबुबिया सोसायटी, परळी वैजनाथ जिल्हा बीड (नोंदणी क्र. एफ 131/बीड) या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 23 मे 2026 रोजी उत्साहात संपन्न झाली. संस्थेचे सदस्य सय्यद इतेशाम उर्फ सलीम भाई यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली.

सभेमध्ये मागील सभेच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली तसेच सन 2025-26 च्या आर्थिक अहवालास मान्यता देण्यात आली. यावेळी सन 2026 ते 2031 या पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी 11 सदस्यीय नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली.

त्यानंतर दि. 24 मे 2026 रोजी नव्याने निवड झालेल्या कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये शेख खाजा शेख महेताब यांची पुन्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून सय्यद इतेशाम उर्फ सलीम जमीन अली यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. तसेच सय्यद हनीफ उर्फ बहादुर भाई सय्यद करीम यांची सचिवपदी, सय्यद इस्माईल करीम यांची सहसचिवपदी तर ताज खान अमीर खान यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

याशिवाय कार्यकारी मंडळाच्या सदस्यपदी सय्यद हुसेन करीम, सय्यद वाजेद कादर, मोहम्मद रफिक रज्जाक, मुसा खान गुलाब खान, झोबिया सय्यद इस्माईल आणि सय्यद यासीन हनीफ यांची बहुमताने तसेच एकमताने निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारी मंडळाच्या निवडीनंतर संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# मेहकरी धरणावरील शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रिक पंपांच्या केबलिंगची चोरी; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील पिंपळगाव दाणी येथील मेहकरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विद्युत पंपांच्या केबल चोरी झाल्याची घटना समोर आली आहे.

वाहिरा, पुंडी आणि पिंपळगाव दाणी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. 22 मे 2026 रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या शेतीसाठी बसविण्यात आलेल्या तब्बल 25 इलेक्ट्रिक पंपांच्या केबल चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पंपांच्या वायर तोडून त्या जवळील लिंबाच्या झाडाखाली जाळल्या आणि त्यामधील तांब्याच्या तारा काढून नेल्याचे समोर आले आहे.

या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून उन्हाळ्यात पिकांना पाणी देण्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे. सतत वाढत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी भयभीत झाले असून पोलिस प्रशासनाने तात्काळ तपास करून आरोपींना अटक करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

याबाबत वाहिरा, पुंडी आणि पिंपळगाव दाणी येथील शेतकऱ्यांनी अंभोरा पोलीस ठाण्यात निवेदन देत चोरी गेलेल्या साहित्याचा शोध घेऊन संबंधित चोरट्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

स्थानिक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही परिसरात अशा प्रकारच्या चोरीच्या घटना घडल्या असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना संरक्षण द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

जर चार ते पाच दिवसांत चोर सापडले नाहीतर आम्ही पोलीस स्टेशन अंभोरा या ठिकाणी उपोषणाला बसून असा ईशारा वाहीरा ग्रामस्थांनी दीला आहे.

# पत्नी माहेरी गेल्याच्या मानसिक तणावातून शेतकरी युवक बेपत्ता; चिंचाळा येथील घटना

**आष्टी | प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचाळा येथे राहणारे अशोक दशरथ खवळे (वय 40 वर्षे) हे गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावात असल्याने घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेल्याची घटना घडली असून, याप्रकरणी आष्टी पोलीस स्टेशन येथे हरवल्याची अधिकृत नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चिंचाळा ता. आष्टी जि. बीड येथील रहिवासी दशरथ साहेबराव खवळे (वय 65 वर्षे) हे शेती व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात पत्नी कौशल्या, मुलगा अशोक, सून स्वाती तसेच नातू अनिकेत व नात प्रतिक्षा असे सर्वजण एकत्र राहत होते. कुटुंबामध्ये सर्व काही सुरळीत सुरू असताना मागील महिनाभरापासून कौटुंबिक कारणामुळे अशोक खवळे यांची पत्नी स्वाती ही माहेरी गेली होती. त्या घटनेमुळे अशोक हे मानसिक तणावाखाली असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले आहे.



दरम्यान, दिनांक 20 मे 2026 रोजी सकाळी अंदाजे 08:30 वाजण्याच्या सुमारास अशोक खवळे यांनी घरातील कोणालाही काहीही न सांगता घर सोडले. सुरुवातीला ते आसपासच्या परिसरात गेले असावेत असा कुटुंबीयांचा समज होता. मात्र बराच वेळ उलटल्यानंतरही ते घरी परतले नाहीत. त्यानंतर कुटुंबीयांनी गावातील नातेवाईक, मित्रपरिवार, शेजारी तसेच विविध ठिकाणी शोध घेतला. स्वाती यांच्या माहेरी देखील चौकशी करण्यात आली. मात्र अशोक खवळे यांचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही.

विशेष म्हणजे त्यांचा मोबाईल फोनही बंद लागत असल्याने कुटुंबीयांची चिंता अधिक वाढली आहे. अखेर कुटुंबीयांनी आष्टी पोलीस स्टेशन गाठून घटनेची माहिती दिली. पोलिसांनी सदर प्रकरणाची गंभीर दखल घेत हरवल्याची नोंद केली असून पुढील तपास सुरू केला आहे.

हरवलेल्या अशोक खवळे यांचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे :

नाव : अशोक दशरथ खवळे
वय : 40 वर्षे
उंची : अंदाजे 5 फूट 5 इंच
रंग : काळासावळा
डोळे : काळे
नाक : सरळ
शरीरयष्टी : मध्यम
अंगावरील कपडे : हिरव्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाची पँट

सदर व्यक्ती कोणाला कुठे दिसल्यास किंवा त्यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ आष्टी पोलीस स्टेशन किंवा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संपर्क :दशरथ साहेबराव खवळे
मो. नं. : 9320844599

आष्टी पोलीस स्टेशनमार्फत पुढील तपास सुरू असून कुटुंबीयांकडून अशोक खवळे सुखरूप परत यावेत अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने 26 व 27 मे रोजी उंदरी येथे

## खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम ; पुरस्कार वितरण, शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या अकराव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या नांवे असलेल्या स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने मंगळवार, दिनांक २६ व बुधवार, दिनांक २७ मे २०२६ रोजी केज तालुक्यातील उंदरी येथे विविध उपक्रम तसेच मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोबतच खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम ही होणार आहे. या सर्व कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीमती प्रभावती बालासाहेब ठोंबरे-पाटील आणि जनार्धनराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.




येथील कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, विद्यार्थीप्रिय दिवंगत सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या अकराव्या पुण्यस्मरणानिमित्त मंगळवार, दिनांक २६ मे रोजी सायंकाळी ७ वाजून १५ मिनिटांना उंदरी (ता.केज) येथे खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अशोक थोरात (संचालक, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, मुंबई.) आणि उद्घाटक म्हणून डॉ.नरेंद्र काळे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य दंत परिषद तथा सचिव, बनेश्वर शिक्षण संस्था, बनसारोळा.) हे असणार आहेत. यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ.सय्यद रफिक पारनेरकर (संत साहित्याचे गाढे अभ्यासक तथा सचिव, सद्भावना मंच, महाराष्ट्र.), वृक्षमित्र सुधाकर देशमुख (महाराष्ट्र राज्य छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त.), डॉ.वसंत सुर्यवंशी (विस्तार कृषि विद्यावेत्ता, विकृविशिकें, लातूर.) यांचे मौलिक मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच बुधवार, दिनांक २७ मे रोजी सकाळी ठिक ९.३१ ते ९.४० या वेळेत वृक्ष पुजन व संवर्धन करण्यात येवून सकाळी १० वाजता नियोजित कार्यक्रमास सुरूवात होईल. उंदरी (ता.केज) येथील कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती भवन येथे अकराव्या पुण्यस्मरणानिमित्त पुरस्कार वितरण व शेतकरी मेळावा देखिल आयोजित करण्यात आला आहे. या शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन डॉ.अशोक ढवण (माजी कुलगुरू, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.) यांच्या हस्ते होईल. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.वेदप्रकाश पाटील (माजी कुलगुरू, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.) हे असणार आहेत. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून नंदकिशोर मुंदडा (नगराध्यक्ष, नगरपरिषद, अंबाजोगाई.), रमेशराव आडसकर (चेअरमन, अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना.लि.अंबाजोगाई.), पृथ्वीराज साठे (माजी आमदार, केज विधानसभा मतदारसंघ संघ.), डॉ.उदय खोडके (माजी संचालक शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.), ऍड.राजेश्वर चव्हाण (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉँग्रेस (अ.प.), बीड.), राहुल सोनवणे (जिल्हाध्यक्ष, भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस, बीड.) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असणार्या ६ मान्यवरांना कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती पुरस्कार तर अन्य २ जणांना अनुक्रमे स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील व स्व.सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. एकूण ८ पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा समावेश आहे. त्यातील शिवाजीराव परबतराव जाधव (मु.पो.चिकलठाणा, ता.जि.लातूर.) यांना विक्रमी ऊस उत्पादन व शेतकरी स्वावलंबन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुशल कारभारी किसान पुरस्कार-२०२६, डॉ.प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील (मु.पो.बोरगाव (धनेश्वरी), ता.कळंब, जि.धाराशिव.) यांना बंधुत्व, माता-पिता सेवा, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती आदर्श बंधू भरत व भक्त पुंडलिक पुरस्कार-२०२६, सौ.संगीता शरद झरे (मु.पो.बुधोडा, ता.औसा, जि.लातूर.) यांना सामाजिक, सेंद्रिय शेती, महिला व अनाथ-पिडीतांची सेवा व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती सामाजिक सेवा पुरस्कार-२०२६, अरूण माधवराव समुद्रे (मु.पो.ता.जि.लातूर.) यांना पत्रकारिता, आकाशवाणी, दूरदर्शन, शिक्षण व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती पत्रकारिता पुरस्कार-२०२६, श्रीमती लक्ष्मीबाई प्रभाकर कराड (मु.पो.सायगाव, ता.रेणापूर, जि.लातूर.) यांना नैसर्गिक शेती, वृक्ष संवर्धन, महिला जागृती आणि समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी स्व.सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुशल कारभारीन किसान पुरस्कार-२०२६, डॉ.छगन जयसिंग राठोड (मु.पो.वासली, ता.पातूर, जि.अकोला.) यांना सेंद्रिय शेती, महिला सक्षमीकरण व पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती कृषिउद्योग भूषण पुरस्कार-२०२६, डॉ.सय्यद रफिक पारनेरकर (मु.पो.ता.पारनेर, जि.अहिल्यानगर.) यांना वारकरी सांप्रदायिक प्रबोधन, साहित्य निर्मिती, वैद्यकीय सेवा व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती सद्भावना पुरस्कार-२०२६ आणि डॉ.बालासाहेब संभाजीराव सोनवणे (मु.पो.उंदरी, ता.केज, जि.बीड.) यांना आरोग्य सेवा, पर्यावरण व समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती उंदरी ग्रामभूषण पुरस्कार-२०२६ हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. २६ व २७ मे २०२६ या दोन्ही दिवशी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांसाठी केज, अंबाजोगाई, धारूर, माजलगाव तालुका आणि लातूर, परभणी, धाराशिव, अकोला, अहिल्यानगर तसेच बीड जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीमती प्रभावती बालासाहेब ठोंबरे-पाटील आणि जनार्धनराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या वतीने करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उंदरी (ता.केज) येथील समस्त गांवकरी, माजी कृषी विद्यार्थी संघ व मित्र परिवार, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी आदिंनी पुढाकार घेतला आहे.